सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
GOVERNMENT OF MAHARASHTRA
महाराष्ट्र राज्य महिला आयोग
Maharashtra State Commission For Women
// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

गृहनिर्माण भवन (म्हाडा बिल्डिंग)
पोटमाळा, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
Tel. : 022-2659 0474 / 2659 1142
Website : www.mscw.org.in

Gruha Nirman Bhavan (MHADA Bldg.)
Mezzanine Floor, Kalanagar, Bandra (E.), Mumbai 400 051.
Fax : 022-2659 1541, Helpline No. 74777 22424
E-mail : mscwmahilaayog@gmail.com

क्रमांक :- ममआ-2022/EM/का-3/88
दिनांक :- 03/01/2022

## नोटीस

महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यालयामार्फत राज्यातील महिला सुरक्षितेविषयी जागर मोहिमेच्या माध्यमातून चळवळ उभी रहावी. या चळवळीच्या माध्यमातून महिलाविषयक कायद्यांविषयी जाणीवजागृती व्हावी. यासाठी दिनांक 16 डिसेंबर 2021 रोजी "आदिशक्ती अभियाना"ची सुरुवात मा.गृहमंत्री श्री.दिलीप वळसे-पाटील यांच्या शुभहस्ते सुरू करण्यात आली आहे. या निमित्ताने राज्यात महिलांच्या प्रश्नांविषयी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे नियोजन आहे. राज्यातील महिलांना शक्ती कायदा विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात दि.23.12.2021 रोजी सर्वानुमते संमत करण्यात आला. महिलांवर अत्याचार करणाऱ्यांना कालमर्यादेत शिक्षा किंवा पोलीस यंत्रणेकडून गुन्हा दाखल होण्यासाठी आखून दिलेली कालमर्यादा ही बाब शक्ती कायद्यात अधोरेखीत होते. शक्ती विधेयकातील तरतूदी सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याच्या अनुषंगाने दि.12.01.2022 रोजी परिसंवादाचे आयोजन येथे करण्यात येत आहे. सदर कार्यक्रमाचे नियोजन करण्याकरीता कार्यक्रम व्यवस्थापक (Event Managements) साठी नामांकित संस्थांकडून संपूर्ण माहितीसह सीलबंद लखोट्यात दरपत्रके मागविण्यात येत आहेत. तरी इच्छूक असणा-यांनी **आपल्या लेटरहेडवर कार्यालयास दरपत्रके सादर करावीत. तसेच दरपत्रकामये G.S.T. नंबर लागूकर अकारणी स्वतंत्ररित्या दर्शविण्यात यावा. तसेच नोटीस संदर्भाचा उल्लेख करणे आवश्यक आहे.**

त्यानुसार खालील प्रमाणे कार्यक्रमाचे नियोजन करण्यात यावे.

- कार्यक्रमास समाजातील काही मान्यवर महिला, महिला पोलीस, समुपदेशक, NGO चे प्रतिनिधी, महिला वकील यांचा कार्यक्रमात सहभाग असेल.
- कार्यक्रमासाठी स्टेजवर एक LED आणि विषयानुसार स्टेजवरील मांडणी असावी.
- या संपूर्ण कार्यक्रमाचं 3 कॅमेरा सेटअपने व्हिडियो शूटिंग आणि फोटोग्राफी करावी.
- सभागृहाच्या प्रवेशद्वारापाशी एक गेट बांधावा ज्यावर कार्यक्रमाचं स्वरुप आणि मा.अध्यक्षा यांचा फोटो असेल. काही बॅनर स्टेजवर किंवा हॉलमध्ये लावण्यात यावे. ज्यावर अभियानाविषयी माहिती असेल.

सदर नोटीसद्वारे उपरोक्त पत्यावर दिनांक 07/01/2022 रोजीपर्यंत दुपारी 12.00 वाजेपर्यंत सादर करावीत. सदर दरपत्रके त्याच दिवशी दुपारी 12.00 वाजता उघडण्यात येतील. संबंधितांच्या अधिकृत प्रतिनिधींनी आयोग कार्यालयात उपस्थित रहावे. तरी सदर बाबतचा अंतीम निर्णय संपूर्णत: महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यालयाकडे राखून ठेवण्यात येत आहे. कृपया याची नोंद घ्यावी.

प्रशासकीय अधिकारी करीता

ठिकाण :- मुंबई